
# प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती

- (अ) ग्रीक
  - राजकीय व्यवस्था
  - सामाजिक जीवन
  - आर्थिक जीवन
  - सांस्कृतिक जीवन
  - कला व स्थापत्य
  - क्रीडा
  - धर्मकल्पना
- (ब) भारत
  - हडप्पा संस्कृती
  - वैदिक संस्कृती
  - धर्मकल्पना
- (क) अरब
  - अरबांचा उदय
  - इस्लामचा उदय
  - अरबांचा साम्राज्य विस्तार
  - आर्थिक जीवन
  - सांस्कृतिक जीवन
  - अरबांचे योगदान


(अ) ग्रीक
राजकीय व्यवस्था
सामाजिक जीवन
आर्थिक जीवन
सांस्कृतिक जीवन
कला व स्थापत्य
क्रीडा
धर्मकल्पना
लोकशाही प्रधान
पितृ-सत्ताक
भौगोलिक परिस्थितीनुसार
होमर
हिरोडोटस
ॲरिस्टॉटल
युक्लिड
सोफोक्लीस
वास्तुकला
ऑलिंपिक स्पर्धा
निसर्गातील शक्ती


# (ब) भारत

- हडप्पा संस्कृती
  - नगररचना
  - सामाजिक व सांस्कृतिक जीवन
  - हडप्पा कालीन धर्मकल्पना
- वैदिक संस्कृती
  - आर्यांच्या वसाहती
  - वैदिक वाङ्मय
  - आर्यांची राज्यव्यवस्था
  - आर्यांचे आर्थिक जीवन
  - आर्यांचे सामाजिक जीवन
  - सांस्कृतिक जीवन
- धर्मकल्पना
  - वैदिक धर्म
  - जैन धर्म
  - बौध्द धर्म

# (क) अरब

- अरबांचा उदय
  - व्यापार वाढ
  - जगाशी संपर्क
- इस्लामचा उदय
  - शिकवण
  - प्रसार
  - खिलाफत
- अरबांचा साम्राज्य विस्तार
- अरबांचे आर्थिक जीवन
  - व्यापार वाढ
- अरबांचे सांस्कृतिक जीवन
- अरबांचे योगदान
  - ज्ञान, विज्ञान आणि साहित्य
  - कला व स्थापत्य

# ग्रीक कालखंडाची कालगणना



## पार्श्वभूमी –

- ग्रीस, भारत आणि अरब या देशांची संस्कृती समजण्यासाठी आपल्याला प्रागैतिहासिक काळ समजून घेणे गरजेचे आहे.
- प्रागैतिहासिक काळातील मानवाला अग्नीचा शोध लागला, तो शेती व पशुपालन करु लागला, त्याला चाकाचा शोध लागला त्यामुळेच मानवी जीवन स्थिर होण्यास मदत झाली.
- आता आपण ग्रीक संस्कृतीचा अभ्यास करु यात.

प्रस्तावना –

- युरोप खंडाच्या आग्नेय दिशेला म्हणजे पूर्व आणि दक्षिण दिशेच्या मध्ये असणाऱ्या ग्रिशिया बेटावरुन ग्रीस हा शब्द प्रचलित झाला.
- ग्रीस देशाला हेलास या नावानेही ओळखले जात होते.
- प्राचीन भारत आणि प्राचीन ग्रीस यांच्यातील संबंध सिकंदरच्या आक्रमणापासून सुरु झाले.



## हे तुम्हाला माहित आहे का?

- भारताच्या आग्नेय दिशेस कोणकोणते देश आहेत?
- ग्रीस देश हेलास नावाने ओळखला जायचा तसे जगातील कोणकोणत्या  देशांना दोन नावे होती?

    उदा – सिलोन = श्रीलंका


    म्यानमार = ब्रह्मदेश

# प्राचीन ग्रीसचा नकाशा



- सिकंदर ऊर्फ अलेक्झांडर याने इराणच्या साम्राज्याचा पाडाव केल्या नंतर भारतावर स्वारी केली.
- अलेक्झांडरला भारतावर विजय मिळवता आला नाही, त्यामुळे अलेक्झांडर भारतातून परत निघून गेला.
- अलेक्झांडरच्या स्वारीनंतर भारत व ग्रीस या दोन देशांतील दळणवळण वाढले. ग्रीकांच्या स्वारीचे परिणाम आता आपण अभ्यासणार आहोत.



चला विचार करुया.

सिकंदरला  भारतात येण्याची गरज का भासली?

https://youtu.be/Gl4l6pgHKc0

# अलेक्झांडरच्या स्वारीचा शिल्पकलेवर झालेला परिणाम



भारतीय मूर्ती



ग्रीक शिल्पकलेचा प्रभाव असणारी मूर्ती

- ग्रीकांच्या शिल्पकलेचा भारतीय शिल्पकलेवर प्रभाव पडला.
- त्यातून निर्माण झालेल्या शैलीला " गांधार शिल्पशैली " असे म्हणतात.

  उदा –

  १. गौतम बुध्द यांच्या मूर्ती

  २. सध्या पाकिस्तानातील तक्षशिलेजवळचा कनिष्काचा स्तूप.

  इत्यादी.

# अलेक्झांडरच्या स्वारीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम



ग्रीकांची नाणी



भारतीय नाणी

- ग्रीकांची नाणी सुबक होती. तर भारतीय नाणी ओबडधोबड होती.
- ग्रीक नाण्यांवर एका बाजूला राजाचे नाव आणि दुसऱ्या बाजूला एखाद्या देवतेचे चित्र असे.
- अशी सुबक नाणी तयार करण्याची कल्पना भारतीयांना ग्रीकांपासून मिळाली.
- भारत व भारताच्या पश्चिमेकडील देश ( इराण, इजिप्त, सुदान, सौदी अरेबिया इ.) यांच्यातील व्यापाराला चालना मिळाली.

## माहिती शोधूया.

वेगवेगळ्या देशांमधील नाणी गोळा करुन तुलना करा.
(आकार, वजन, सुबकता, धातूचा प्रकार इ.)

# ग्रीसची भौगोलिक परिस्थिती –

- ग्रीस देशाच्या तिन्ही बाजूला भूमध्य समुद्र आहे.
- भूमध्य समुद्र असल्यामुळे तेथील लोक उत्तम दर्यावर्दी आहे.
- दक्षिणेकडे तुटक डोंगराळ प्रदेश आणि शेकडो लहान बेटे यांमुळे तेथे प्रबळ मध्यवर्ती सत्ता निर्माण होऊ शकली नाही.



## माहिती शोधूया.

भारताला सुध्दा तिन्ही बाजूला समुद्र आहे त्याचे काय फायदे- तोटे झाले ते लिहा.

## ग्रीक मधील नगरराज्ये –

- इटली व ग्रीसमध्ये इ.स.पूर्व ४ थ्या व ५ व्या शतकात काही स्वतंत्र नगरराज्ये अस्तित्वात होती.
- नगरराज्ये म्हणजे लोकांचे राज्य.
- या नगरांना प्राचीन ग्रीसमध्ये पलिस म्हणत असत.

  उदा -

  ग्रीसमधील अथेन्स, स्पार्टा, कॉरिंथ, मॅरेथॉन, डेल्फी इ.

## ग्रीसमधील लोकशाही –

- कमी लोकसंख्येमुळे मर्यादित लोकशाही प्रयोग तत्कालीन काही नगरराज्यांत शक्य झाला.
- अथेन्समधील लोकशाहीमध्ये लोकशाही राज्यपद्धतीची बीजे होती.
- सभासद व राज्याचे अधिकारी लोकांकडून निवडले जात.
- सर्व नागरिक एकत्र जमून न्यायनिवाडा करीत असत.

चला विचार करुया ....

आपल्या आजूबाजूला लोकशाहीची प्रतिके आपणास कोठेकोठे दिसतात?

उदा – वर्गातील सेक्रेटरीची निवड.

# राजकीय व्यवस्था –

- डोंगराळ प्रदेश, शेकडो लहान बेटे, मर्यादित शेत जमीन या भौगोलिक रचनेमुळे ग्रीक समाज लहान-मोठया समूहांमध्ये विभागला गेला होता.
- सामान्यपणे येथील नगरराज्यांमध्ये लोकशाही राज्यव्यवस्था होती.
- लोकशाहीची कल्पना ही ग्रीक संस्कृतीची देणगी मानली जाते.



- अथेन्समधील लोक राज्यप्रमुखास “ऑरकॉन” असे म्हणत असत.
- अथेन्स हे नगरराज्य कला, तत्त्वज्ञान व राजकीय विचार यांच्यासाठी प्रसिध्द होते.
- अथेन्सच्या शेजारचे स्पार्टा हे लष्करी व विस्तारवादी राज्य होते.

अशाप्रकारे आपल्याला ग्रीक राजकीय व्यवस्था सांगता येईल.

## माहिती शोधूया.

आपली शाळा ठराविक वेळी भरते व ठराविक वेळी सुटते. वर्षानुवर्षे ही व्यवस्था कशी चालत आहे हे शिक्षकांच्या मदतीने समजून घेऊयात.

## सामाजिक जीवन –

- ग्रीक नगरराज्ये ही छोटया-छोटया बेटांमध्ये विभागलेली जरी असली तरी त्यांची समाजरचना, धर्मकल्पना व जीवन पध्दती यात बरेच साम्य आहे.
- त्यामुळेच या नगरराज्यांच्या एकत्रित संस्कृतीला “ग्रीक संस्कृती” असे म्हणतात.

## आर्थिक जीवन –

- ग्रीस मध्ये फळांच्या बागा, लाकूड व्यवसाय, मेंढीपालन व कापूस शेती हे महत्त्वाचे उदयोग होते.

## ग्रीसमधील फळे –


- सफरचंद
- ऑलिव्ह
- डाळिंब
- द्राक्षे
- कलिंगड
- चेरी
- अंजीर
- जर्दाळू
- पीच

फळांची चित्रे टाकणे

- ऑलिव्ह या फळापासून ग्रीक लोक तेल काढत असत.
- वरील फळे व ऑलिव्ह तेल हे त्यांच्या निर्यातीचे प्रमुख घटक होते.



ऑलिव्ह





- उपवासाच्या दिवशी आपण जी फळे खातो त्यातील कोणती फळे भारतीय आहेत?

## उदयोग-धंदे –

- ग्रीसमध्ये मोठया प्रमाणात नैसर्गिकरित्या संगमरवर दगड उपलब्ध असल्यामुळे त्याची निर्यात करणे हा व्यवसाय चालत असे.



चला जरा विचार करुया.....

भारतातील संगमरवरांत केलेले सर्वात विलोभनीय बांधकाम कोठे आहे?

## मेंढीपालन –


- डोंगराळ भाग असल्यामुळे तेथे  मेंढयापालनाचा व्यवसाय चालत होता.



चला हे माहित करुन घेऊया....

हिवाळयात आपण लोकरीचे स्वेटर घालतो ही लोकर मेंढ्यांपासून तयार होते. आपल्या दैनंदिन जीवनाशी कोणकोणत्या प्राण्यांचा संबंध येतो? वर्गात गटचर्चा करुन यादी करा.

# जहाजबांधणी उदयोग -




आधुनिक चित्र

- देशाला समुद्र किनारा असल्यामुळे जहाजबांधणी उदयोग येथे चालत असे.
- व्यापार आणि उदयोग यांमुळे ग्रीकांचे जीवन सुखी झाले होते.

## माहिती घेऊया ...

भारतात जहाजबांधणी व जहाज तोडणे हे दोन्ही उदयोग कोठे चालतात याची माहिती शिक्षकांच्या मदतीने घ्या. शक्य झाल्यास अशा उदयोगाला भेट दया.

# Assessment

- योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ग्रीस या देशाला ........ या नावाने ओळखले जाते.
( हेलास, पलास, डगलास )

२. ग्रीसमध्ये मोठया प्रमाणात नैसर्गिकरित्या ...... दगड उपलब्ध होता.
( काळा, संगमरवर, जांभा)

३. अथेन्समधील लोक राज्याच्या प्रमुख शासकास ...... असे म्हणत असे.
(ऑरकॉन , आयकॉन, ऑरगॉन )

# Exercises

- अलेक्झांडरचे चरित्र मिळवून वाचा. स्नेहसंमेलनात वर्गातील विदयार्थ्यांनी एकत्र येवून अलेक्झांडरचे जीवन व ग्रीस देशातील लोकशाही व्यवस्था नाटय स्वरुपात सादर करावी.
- शिक्षकांच्या मदतीने भारतीय व परदेशी वृक्ष, फळे यांची यादी तयार करा.
- मंडई किंवा आठवडे बाजारात जावून स्थानिक भाज्या व फळे यांची माहिती घ्या.